# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


**पत्र**

विषयः- **वन जमिन रायगड**

मुंबई-पुणे दुतगती मार्गाचे मिसिंग लिंकचे बांधकामाकरीता स्टेशन ठाकूरवाडी ते द्रुतगती मार्ग दरम्यान 22 केव्ही विद्युत वाहिनी टाकरणेकरीता 0.9127 हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव...

जावक क्र. ब/20/जमिन/ 5114 /2019-20.

अलिबाग – 402 201, दिनांकः- 11 /03/2020.

प्रति,

कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत,

मुंबई.

संदर्भः- आपलेकडील पत्र क्र. एमएसआरडीसी/वायसीइडब्लूएमएल/26/2018-पार्ट-XIII/ 2019/7635, दिनांक 11/12/2019. (प्राप्त दिनांक 12/2/2020.)

आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये विषयांकीत कामाकरीतां वनजमिन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास 1 प्रतीत दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावाची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1) प्रस्तावासोबत मौजे वरोसे तर्फे बोरेटी, काटरंग व आडोशी, ता. खालापूर या गावाची एकत्रित दर्शविलेला नकाश जोडला आहे. त्यावर नकाशाचे प्रमाण दर्शविलेले नसल्यामुळे मागणी क्षेत्रातील सर्व्हे नंबरची लांबी बाबत शहानिशा करणे शक्य होत नाही. त्याकरीता मागणी क्षेत्र स्वतंत्र योग्य प्रमाणांतील गाव नकाशावर आखणी मार्ग दर्शवून, वनक्षेत्र विवधि रंगसंगतीने दर्शविणेत यावे. तसेच त्याबाबतची सूची तसेच क्षेत्र विवरण तक्ता त्या त्या नकाशावर दर्शविण्यात यावेत.

2) प्रस्तावांत समाविष्ट असणारे मौजे वरोसे येथील सर्व्हे नंबर 17 चे क्षेत्राचा वैधानिक दर्जा भारतीय अधिनियम, 1927 चे कलम 4 अनुसार राखीव वनाचा आहे. त्यामुळे सदर क्षेत्राचा वनक्षेत्र मागणी मध्ये समावेश होणे आवश्यक आहे. तसेच सर्व्हे नंबर 18/1, 18/2 चे क्षेत्राबाबत नवीन जुने सर्व्हे नंबरचा तपशील व त्याअनुषंगाने 7/12 उतारे व फेरफार उपलब्ध करुन देणेस विनंती आहे. जेणेकरुन याक्षेत्राबाबत खाजगी वनाच्या तरतुदी लागू आहेत अगर कसे याबाबत खात्री करणे शक्य होईल.

3) प्रस्तावांतील मौजे काटरंग ता. खालपूर येथील सर्व्हे नंबर 38/1, 38/2, 38/3 चे क्षेत्र क्षेत्र हे वनसदृष्य क्षेत्राचे यादीमध्ये समाविष्ट क्षेत्र आहे. त्यामुळे सदर क्षेत्र वनक्षेत्र म्हणुन क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

4) प्रस्तावांत दर्शविलेले सर्व्हे नंबर 123 व 126 चे क्षत्र खाजगी वन म्हणून दर्शविलेले आहे. याबाबतचा वैधानिक दर्जाची शहानिशा या कार्यालयाकडील अभिलेखाशी करणेकरीता सदर सर्व्हे नंबरची गट स्कीम उतारे उपलब्ध करुन देण्यात यावेत ही विनंती.

5) प्रस्तावांत बाधीत होणारे वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राचे 7/12 उतारे उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच वनक्षेत्राचे 7/12 उतारे आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन प्रस्तावांत सामील करणेत यावे.

6) प्रस्तावांत बाधीत होणारे वनक्षेत्रांत वनहक्क बाधीत होत नसल्याबाबतचे जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील विहित नमुन्यांतील प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करण्यात यावे.

7) प्रस्तावांत फार्म-अ भाग-1 मध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रमाणपत्र, नकाशा, माहिती जोडण्यात आलेली आहे. त्या त्या प्रमाणपत्र, नकाशा, माहितीचा प्रस्तावांतील पान क्रमांक नमुद करणेत यावा.

8) प्रस्तावांत स्वाक्षरीकर्ता हयांना प्राधिकृत केलेबाबतचे प्राधीकार पत्र व प्रस्तावावर स्वाक्षरीकर्ता हयांनी ज्या ज्या ठिकाणी स्वाक्षरी केली आहे त्या त्या ठिकाणी त्यांचे नाव व पदनाम नमुद करणे व त्यांचा कार्यालयीन सिल उमटविणे आवश्यक आहे.

9) प्रस्तावांत सदर विद्युत वाहिनिकरीता प्रस्तावीत करणेत आलेले तीन आखणी मार्ग व त्यांनी सदर आखणी मार्ग निवडण्याबाबत कारणमिमांसा दर्शविणारे प्रमाणपत्र/तपशील प्रसतावांत सामील करणेत आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेर या कार्यालयास ऑनलाईन व प्रस्तावाचे संचासह सादर करणेत यावा.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, खालापूर व कर्जत (पश्चिम) यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी उक्त प्रस्तावीत विद्युत वाहिनीमध्ये बाधीत होणारे वनक्षेत्रांत किती वृक्षतोड करावी लागणार आहे याबाबतची वृक्षांची वेढीवार यादी व त्याचे निष्कासनाकरीता आवश्यक असणारे रक्कमेबाबतचे अंदापत्रक तयार करुन सहा. वनसंरक्षक यांचे मार्फत आठ प्रतीत या कार्यालयास सादर करावे. तसेच सदर प्रकल्पांत बाधीत होणारे वनक्षेत्राचे बदल्यांत दुप्पट वनक्षेत्रावर वनीकरणाकरीता अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत करणेत यावे.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, (अधिसंख्य) कर्जत यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी सदर प्रस्तावीत क्षेत्राची मोका पहाणी करुन त्याचा मोका पहाणी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

\\Land2\d\LAND 3\2019-2020\FC ACT\MPEW missing link Electrical connection\Temporary electrical connection.doc